# प्रेसनोट

दि. २१/१०/२०२२

## कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील सहायक पोलीस निरीक्षक व पोलीस अंमलदारावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १०५५/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७अ, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - २७ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक -<br>१) हर्षदा बाळासाहेब दगडे, पद - सहायक पोलीस निरीक्षक नेमणूक - कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर<br>२) अभिजीत विठ्ठल पालके, पद – पोलीस शिपाई, नेमणूक - कोंढवा पोलीस स्टेशन, पुणे शहर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५०,००० रू. (पन्नास हजार) |

पडताळणी दिनांक :- २८/०९/२०२२

गुन्हा दाखल दिनांक :- २०/१०/२०२२

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार व त्यांचे कुटुंबियांवर दाखल असलेल्या गुन्हयाचे चार्टशिटमध्ये मदत करण्यासाठी व फिर्यादी यांचे आई वडील व बहीण यांना अटक न करण्यासाठी लोकसेवक अभिजीत पालके, पोलीस शिपाई व लोकसेवक हर्षदा दगडे, सहायक पोलीस निरीक्षक यानी लाच मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची दिनांक २८/०९/२०२२ रोजी पडताळणी केली असता व त्यांचे कुटुंबियांवर दाखल असलेल्या गुन्हयाचे चार्टशिटमध्ये मदत करण्यासाठी व फिर्यादी यांचे आई वडील व बहीण यांना अटक न करण्यासाठी स.पो.नि. हर्षदा दगडे व पोलीस शिपाई अभिजीत पालके यानी लाचेची मागणी केली. पोलीस शिपाई अभिजीत पालके यानी तडजोडीअंती ५० हजार रूपयांची लाच मागणी केली व त्या लाच मागणीस लोकसेवक हर्षदा दगडे यानी सहाय्य केले म्हणून वरीलप्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक, प्रविण निंबाळकर तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

७. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
८. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
९. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
१०. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
११. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
१२. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.